**प्रसिध्दी पत्रक** दिनांक ०३/०७/२०२६

(१)आलोसे - मिरा नारायणराव लोकरे, वय ३७ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद लिपीक टंकलेखक, ( वर्ग क ) व (२) आलोसे सय्यद जफर सय्यद अकबर, वय ५३ वर्षे, पद लिपीक टंकलेखक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, असोला ता. जि.परभणी यांनी तक्रारदार यांच्याकडून १३००/- रूपये लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग। | परभणी. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे ताडकळस, परभणी गुरंन. १८५/२०२६ कलम ७ भप्रअधि.येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | १)मिरा नारायण लोकरे, वय ३७ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद लिपीक टंकलेखक, ( वर्ग क ), नेमणुक उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, असोला ता.जि.परभणी. रा. यशवंत नगर, परभणी.<br>२) सय्यद जफर सय्यद अकबर, वय ५३ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद लिपीक टंकलेखक, ( वर्ग क ), नेमणुक उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, असोला ता.जि.परभणी. रा. मुमताज नगर, धाररोड परभणी. |
| लाच मागणी रक्कम | आरोपी क्र. १) लाचेची मागणी ८००/- ( आठशे रूपये )<br>आरोपी क्र. २) लाचेची मागणी ५००/- ( पाचशे रूपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | आरोपी क्र. १) लाचेची मागणी ८००/- ( आठशे रूपये )<br>आरोपी क्र. २) लाचेची मागणी ५००/- ( पाचशे रूपये ) |
| सापळा अधिकारी | श्री.अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. परभणी |
| तपास अधिकारी | श्री. महेश पाटणकर, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि. परभणी |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांची मोटार सायकल स्वत:च्या नावावर करण्यासाठी लाचेची मागणी. तसेच केलेल्या कामाकरीता नो वॉन्टेड लिहीलेला शिक्का मारुन त्यावर मोटार सायकलचा नंबर लिहून त्याखाली सही करण्यासाठी लाचेची मागणी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी दि. ०१/०७/२०२६ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये विकत घेतलेली मोटारसायकल स्वत:च्या नावावर करण्यासाठी आवश्यक ती ऑनलाईन फी भरली होती. ३० जून २०२६ रोजी जेव्हा ते उपप्रादेशिक परिवहन कार्यालय असोला येथे गेले तेंव्हा, लिपिक मीरा लोकरे यांनी काम पूर्ण करण्यासाठी १०००/- रुपयेची लाचमागणी करीत असलेबाबत तक्रार प्राप्त झाली.<br>. त्यावरुन दि.०१/०७/२०२६ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कार्यवाही वेळी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आसोला येथे लोकसेविका लिपीक टंकलेखक मीरा लोकरे यांनी तक्रारदारकडील मोटार सायकलचे कागदपत्रे जमा करून घेण्यासाठी व सदर मोटार सायकल तक्रारदाराचे नावावर करण्याकामी पुढील कार्यवाही करण्यासाठी सुरवातीस १०००/- रू. सांगूण तडजोडीअंती ८००/- रू. लाचेची माणणी केली. तसेच लोकसेवक लिपीक जफर यांनी तक्रारदाराने खरेदी केलेल्या मोटार सायकलचा नंबर संगणकावर पडताळून मोटार सायकल आर.टी.ओ कार्यालयामार्फत दंड प्रलंबित नसल्याची खात्री करून कागदपत्रावर नो वॉन्टेड लिहिलेला शिक्का मारून त्यावर मोटार सायकलचा नंबर लिहून त्याखाली सही करून केलेल्या कामाकरीता तक्रारदारास ५००/- रू. लाचेची मागणी पंच क्रं. ०१ यांचे समक्ष केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक ०३/०७/२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान उप प्रादेशिक परिवहन कार्यालय असोला येथे लोकसेविका कनिष्ठ लिपिक टंकलेखक मीरा लोकरे, यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष ८००/- रू. लाचेची रक्कम स्वत: स्विकारली आहे. तसेच लोकसेवक जफर यांनी तक्रारदाराकडून पंचा समक्ष ५००/- रूपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारलेवरून आलोसे यांचे विरुध्द पो.स्टे ताडकळस येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आलोसे यांच्या घराची घरझडती घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो परभणी

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अश्विनी जगताप, ला.प्र.वि नांदेड परिक्षेत्र नांदेड, यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण/तपास अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री. महेश पाटणकर ला.प्र.वि परभणी, व सापळा अधिकारी पोनि श्री. अल्ताफ मुलाणी यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी सहा.फौज/निलपत्रेवार, मपोह/१३०६ चाटे, पोना/१३९७ बेंद्रे, पोशि/१६२२ बोधनकर, पोशि/१६३१ शेख जिब्राहिल, पोशि/१६६५ घुले, ला.प्र. वि. परभणी यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- १) **मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड** |
| | :- २) कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी<br>नानलपेठ पोलीस स्टेशनच्या बाजुला , शनिवार बाजार, नानलपेठ परभणी. |
| ई - मेल | :- १) spacbnanaded@mahapolice.gov.in<br>२) dyspacbparbhani@mahapolice.gov.in दुरध्वनी क्र :– 02452 & 220597 |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharastra.net टोल फ्रि क्रंमाक १०६४ |
| पोलीस अधीक्षक | :- ९२२६४८४६९९ |
| पोलीस उप अधीक्षक | :- ९८७०३१३१५७ व्हॉटसअप क्रंमाक - ९२७२२११०६४. |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel<br>@ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी